प्रातःकाल
www.pratahkal.com

निळजे रेल्वे उड्डाणपुलाला तडे; एक लेन वाहतुकीसाठी बंद

डोंबिवली-शिळफाटा मार्गावरील पुलाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह; स्ट्रक्चरल ऑडिट व तातडीच्या दुरुस्तीची नागरिकांची मागणी

कल्याण, दि. ०४ (वार्ताहर) : कल्याण-शिळफाटा मार्गावरील निळजे रेल्वे उड्डाणपुलाला तडे गेल्याचे शनिवारी निदर्शनास आल्यानंतर प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून डोंबिवलीहून शिळफाट्याकडे जाणारी एक लेन तातडीने वाहतुकीसाठी बंद केली. पुलाच्या डाव्या बाजूचे संरक्षक फेन्सिंग सरकल्याचे आणि कडेला तडे पडल्याचे आढळून आल्याने पुलाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या मार्गावर दररोज हजारो वाहने धावत असल्याने वाहतूक कोंडीबरोबरच संभाव्य दुर्घटनेची भीती व्यक्त होत असून तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

घटनास्थळी पाहणीदरम्यान पुलाच्या कडेला तडे पडल्याचे तसेच संरक्षक फेन्सिंग मूळ जागेवरून सरकल्याचे स्पष्ट झाले. कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने संबंधित लेन बॅरिकेड्स लावून बंद केली असून वाहतूक पर्यायी मार्गाने सुरू ठेवण्यात आली आहे.

कल्याण-शिळफाटा मार्ग हा ठाणे, डोंबिवली, कल्याण आणि नवी मुंबईला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावर दिवसभर अवजड व हलक्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. त्यामुळे पुलाची तातडीने तांत्रिक तपासणी करून त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, तसेच आवश्यक दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुलाच्या स्थितीकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याची भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पिस्तुलाचा धाक दाखवून तरुणीचे अपहरण

यवत, दि. ०४ (वार्ताहर) : यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरीभडक येथे घरात घुसून पिस्तुलाचा धाक दाखवत २३ वर्षीय तरुणीचे अपहरण केल्याची धक्कादायक घटना २ जुलै रोजी सकाळी घडली. विरोध करणाऱ्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देत आरोपींनी मारहाण केली. तसेच घरातील पाच लाखांहून अधिक रोख रक्कम आणि सोन्याचे गंठण घेऊन पसार झाल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विद्याधर नारायण पवार (वय ६०) यांच्या बोरीभडक येथील राहत्या घरी २ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी कमरुद्दीन मुकीम शेख (रा. सय्यद नगर, हडपसर, पुणे) हा दोन अनोळखी साथीदारांसह चारचाकी वाहनातून फिर्यादीच्या घरी आला. आरोपींनी फिर्यादींची मुलगी अक्षदा पवार (वय २३) हिला तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने घराबाहेर ओढत आणले आणि चारचाकी वाहनात बसवून पळवून नेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.यावेळी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी आरोपींना अडविण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी पिस्तुलाचा धाक दाखवत गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादींच्या वडिलांना ढकलून मारहाण करण्यात आली, तर पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

ठाण्यात दोन लाख मॅनहोलच्या तपासणीला सुरुवात

मुंबईतील साकीनाका दुर्घटनेनंतर महापालिका सतर्क; दुरुस्तीची गरज असलेल्या मॅनहोलचा अहवाल तयार करण्याचे आदेश

ठाणे, दि. ०४ (वार्ताहर) : मुंबईतील साकीनाका परिसरात उघड्या मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर ठाणे महापालिका सतर्क झाली असून शहरातील दोन लाखांहून अधिक मॅनहोलची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार प्रभागनिहाय तपासणीला सुरुवात करण्यात आली असून ज्या मॅनहोलवर संरक्षक जाळ्या नाहीत किंवा दुरुस्तीची आवश्यकता आहे, त्यांचा अहवाल तयार करून तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

मुंबईतील साकीनाका परिसरात गुरुवारी खैरानी मार्गालगत मनुष्य प्रवेशिकेवर संरक्षक जाळी बसविण्याचे काम सुरू असताना एका व्यक्तीचा मॅनहोलमध्ये पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेची मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी गंभीर दखल घेत चार अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित केले. या घटनेचे पडसाद राज्य विधानसभेतही उमटले असून, त्यानंतर राज्यातील अन्य महापालिकांनीही सुरक्षिततेच्या उपाययोजनांना प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे.

या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने शहरातील सर्व ड्रेनेज आणि गटारांवरील मॅनहोलची पाहणी करण्याचा निर्णय घेतला आहे. ठाणे महापालिका हद्दीत दोन लाखांपेक्षा अधिक मॅनहोल असून, एवढ्या मोठ्या संख्येची तपासणी करण्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीच्या अभियंत्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संबंधित अभियंते आपल्या हद्दीतील प्रत्येक मॅनहोलची पाहणी करून त्याची स्थिती, संरक्षक जाळीची उपलब्धता, झाकणांची मजबुती आणि दुरुस्तीची आवश्यकता याचा अहवाल तयार करणार आहेत.

महापालिका प्रशासनाच्या माहितीनुसार, ज्या मॅनहोलवर संरक्षक जाळ्या नसतील किंवा झाकणे खराब, तुटलेली अथवा धोकादायक अवस्थेत असतील, त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात येणार आहे. पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी साचत असल्याने मॅनहोल दिसत नाहीत आणि त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

महापालिकेने सर्व संबंधित विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून, तपासणीदरम्यान आढळणाऱ्या धोकादायक मॅनहोलभोवती तात्पुरते संरक्षक बॅरिकेड्स उभारणे, सूचना फलक लावणे आणि आवश्यक तेथे तातडीची दुरुस्ती करणे, अशा उपाययोजनांवर भर देण्यात येणार आहे.

मुंबईतील दुर्घटनेनंतर ठाणे महापालिकेने प्रतिबंधात्मक पाऊल उचलत ही मोहीम सुरू केली असून, शहरातील सर्व मॅनहोल सुरक्षित असल्याची खात्री करून नागरिकांच्या जीविताला कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने यंत्रणा कामाला लावली आहे. महापालिका अधिकाऱ्यांनीही प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून पाहणी सुरू केली असून, संपूर्ण तपासणी मोहीम पूर्ण होईपर्यंत कामाला प्राधान्य दिले जाणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल; प्रकृती स्थिर

ठाणे, दि. ०४ (वार्ताहर) : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अचानक तब्येत बिघडल्यामुळे ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राज्याच्या विधिमंडळाच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाचे कामकाज सांभाळत असतानाच, शुक्रवारी रात्री उशिरा त्यांना तीव्र ताप आणि प्रचंड थकवा जाणवू लागल्याने खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. शिवसेना पक्षाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्र्यांची प्रकृती सध्या पूर्णपणे स्थिर आहे. तज्ज्ञ डॉक्टरांचे एक पथक त्यांच्यावर उपचार करत असून डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून एकनाथ शिंदे यांचे वेळापत्रक अत्यंत व्यस्त आणि दगदगीचे होते. ठाकरे गटातील सहा लोकसभा खासदार आणि मुंबईतील ज्येष्ठ नेते सचिन अहिर यांचा आपल्या पक्षात प्रवेश घडवून आणणाऱ्या 'ऑपरेशन टायगर' या मोठ्या राजकीय मोहिमेचे ते नेतृत्व करत होते. या राजकीय घडामोडींमुळे त्यांना वारंवार राष्ट्रीय राजधानी दिल्लीचा प्रवास करावा लागला होता, त्यातच चालू अधिवेशन आणि लागोपाठच्या राजकीय बैठकांमुळे त्यांना हा शारीरिक थकवा आल्याचे सांगितले जात आहे.

पीएम पोषण योजनेचे कामकाज पूर्णपणे ऑनलाइन

तांदूळ साठा, खर्च व लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंद आता एमडीएम पोर्टलवर अनिवार्य

पुणे, दि. ०४ (प्रतिनिधी) : प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण (पीएम पोषण) योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी राज्यातील सर्व पात्र शाळांमध्ये तांदूळ व धान्यसाठा, खर्च आणि लाभार्थी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन नोंदी पूर्णपणे ऑनलाइन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे या सर्व नोंदी एमडीएम (मिड डे मील) पोर्टलवर करणे बंधनकारक राहणार असून, स्वतंत्र नोंदवही ठेवण्याची आवश्यकता राहणार नसल्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक पात्र शाळेने ३० एप्रिल २०२६ अखेर किंवा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील आहार वितरणाच्या शेवटच्या दिवसापर्यंत उपलब्ध असलेल्या तांदूळ व इतर धान्यसाठ्याची माहिती एमडीएम पोर्टलवरील 'प्रारंभिक शिल्लक' या विभागात नोंदविणे आवश्यक राहणार आहे.

ही माहिती इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवी अशा दोन स्वतंत्र गटांमध्ये किलोग्रॅममध्ये नोंदवावी लागणार आहे. शाळांनी साठ्याची माहिती भरल्यानंतर तिची पडताळणी करून अंतिम मंजुरी देणेही अनिवार्य करण्यात आले आहे.

यापुढे विद्यार्थ्यांना दररोज वितरित करण्यात येणारा आहार, लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या तसेच तांदूळ व इतर धान्याच्या प्राप्ती, खर्च आणि शिल्लक साठ्याची माहिती एमडीएम पोर्टल, मोबाईल ॲप किंवा संदेश प्रणालीद्वारे नियमितपणे अद्ययावत करावी लागणार आहे. जिल्हास्तरावर निश्चित करण्यात आलेल्या पाककृतीनुसार आहार वितरणाची नोंदही ऑनलाइनच ठेवावी लागेल.

दर महिन्याच्या अखेरीस पोर्टलवर खर्च आणि शिल्लक साठ्याचा एकत्रित पीडीएफ अहवाल उपलब्ध होणार असून, तो जतन केल्यानंतर स्वतंत्र नोंदवही ठेवण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे कागदोपत्री कामकाज कमी होऊन माहितीचे केंद्रीकृत व्यवस्थापन सुलभ होणार आहे.

मोबाईल ॲपमध्ये जिल्हानिहाय पर्याय दिसत नसल्यास नवीन आवृत्तीचे ॲप डाउनलोड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. ऑनलाइन नोंदींची पडताळणी, तांत्रिक अडचणींचे निराकरण आणि नियमित देखरेख करण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी, पीएम पोषण अधीक्षक आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रारंभिक शिल्लक, धान्याची आवक, मोबाईल ॲपचा वापर आणि दैनंदिन उपस्थिती नोंदविण्यासंदर्भातील चार स्वतंत्र माहिती पुस्तिकाही शाळांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या नव्या ऑनलाइन प्रणालीमुळे पीएम पोषण योजनेच्या अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता, अचूकता आणि उत्तरदायित्व निर्माण होईल, असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

पुरंदर विमानतळासाठी ९६ टक्के भूसंपादन पूर्ण; उर्वरित ४० हेक्टरवर न्यायालयीन पेच

वाढीव मोबदल्यासाठी शेतकऱ्यांची उच्च न्यायालयात धाव; सक्तीच्या संपादनाची शक्यता

पुणे, दि. ०४ (प्रतिनिधी) : पुरंदर तालुक्यात प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, एकूण आवश्यक क्षेत्रापैकी तब्बल ९६ टक्के जमीन प्रशासनाच्या ताब्यात आली आहे. केवळ ४० हेक्टर जमीन अद्याप संपादित होणे बाकी असून, या जमिनीच्या मोबदल्याबाबत काही शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतल्याने उर्वरित प्रक्रियेवर न्यायालयीन पेच निर्माण झाला आहे.

प्रकल्पासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील एकूण १,२१६ हेक्टर जमीन संपादित करण्यात येत आहे. राज्य शासनाने या जमिनीसाठी प्रतिएकर १ कोटी ६१ लाख रुपयांचा मोबदला निश्चित केला आहे. आतापर्यंत १,०१० हेक्टर जमिनीचे संपादन पूर्ण झाले असून त्यासाठी सुमारे १,१५० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. पुढील टप्प्यातील मोबदल्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) आणखी एक हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, उर्वरित जमीनही महिनाभरात ताब्यात घेण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

पारगाव परिसरातील सुमारे ४० हेक्टर जमिनीच्या मोबदल्याबाबत काही शेतकऱ्यांनी वाढीव भरपाईची मागणी करत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मात्र, प्रकल्पासाठी आवश्यक बहुतांश जमीन आधीच संपादित झाल्यामुळे उर्वरित जमिनीचे सक्तीने संपादन करण्याची शक्यता प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

प्रशासनातील सूत्रांच्या माहितीनुसार, स्वेच्छेने भूसंपादनास संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना काही अतिरिक्त लाभ मिळण्याची तरतूद असते. मात्र, न्यायालयीन वादात अडकलेल्या प्रकरणांमध्ये हे लाभ मिळण्याची शक्यता कमी असल्याने संबंधित शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या तोटा सहन करावा लागू शकतो.

मोबदला स्वीकारलेल्या अनेक शेतकऱ्यांनी दौंड, बारामती, शिरवळ आणि फलटण परिसरात नव्याने शेती खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे या भागांतील शेतीजमिनींच्या किमतीत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, काही प्रकरणांमध्ये कौटुंबिक वादांमुळे मोबदल्याचे वाटप रखडल्याने संबंधित शेतकऱ्यांना वाढीव दराने जमीन खरेदी करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेत होणारा विलंब हा शेतकऱ्यांच्या आर्थिक हितालाच बाधक ठरत असल्याचे चित्र आहे.

राज्य सरकारने विमानतळ प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत सुरू करण्यासाठी उर्वरित भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यावर भर दिला असून, न्यायालयीन प्रक्रियेबाबत पुढील निर्णयानुसार प्रशासन आवश्यक कार्यवाही करणार आहे.

जोगेश्वरीत टँकरच्या धडकेत डिलिव्हरी बॉयचा मृत्यू

मुंबई, दि. ०४ (प्रतिनिधी) : मुंबई : मुंबईतील जोगेश्वरी पश्चिम परिसरात मध्यरात्री झालेल्या भीषण हिट अँड रन अपघातात एका डिलिव्हरी बॉयचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. भरधाव वेगाने येणाऱ्या टँकरने दुचाकीला जोरदार धडक दिल्यानंतर चालकाने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत टँकरचा पाठलाग करून चालकाला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले.

मृत तरुणाचे नाव हर्ष असे असून तो डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होता. प्राथमिक माहितीनुसार, हा अपघात रात्री सुमारे १.२० वाजण्याच्या सुमारास जोगेश्वरी पश्चिमेतील अमृत नगर परिसरातील अजित ग्लास गार्डन गेटसमोर घडला. हर्ष आपल्या दुचाकीवरून जात असताना भरधाव टँकरने त्याला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की हर्षचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

अपघात घडल्यानंतर टँकर चालकाने वाहन न थांबवता तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी धाडस दाखवत टँकरचा पाठलाग केला. काही अंतरावर त्यांनी चालकाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. प्रत्यक्षदर्शींनी केलेल्या दाव्यानुसार, टँकर चालक मद्यधुंद अवस्थेत होता. त्यामुळे संतप्त नागरिकांनी त्याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

घटनेची माहिती मिळताच ओशिवरा पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून हर्षचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. अपघातग्रस्त दुचाकी आणि टँकर दोन्ही वाहने पोलिसांनी ताब्यात घेतली असून त्यांची तपासणी सुरू आहे.

Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM DEEPAK ASHOK KUMAR PATHAK TO DEEPAK ASHOK PATHAK AS PER DOCUMENTS

PUBLIC NOTICE

Take notice that My Clients, **1)MRS. KAVITA JITENDRA SAWANE 2) SUHANI JITENDRA SAWANE** have instructed me to invite objection in respect of **SHOP NO.17 ON THE GROUND FLOOR OF BUILDING NO.3/LIBERTY APARTMENTS KNOWN AS R.N.A.LIBERTY CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD. situated at NEAR JANGID COMPLEX, MIRA ROAD (EAST), THANE-401107*(here referred to as the "said shop")***, In Short. **LATE MR. JITENDRA ANANDRAO SAWANE was originally a member of R.N.A.Liberty Co-Operative Housing Society Ltd. situated at Near Jangid Complex, Mira Road(East), Thane-401107, who died on 23-02-2026** and left behind only **Two Legal Heirs** including **1)MRS. KAVITA JITENDRA SAWANE (Wife) 2)SUHANI JITENDRA SAWANE(Minor-Daughter)** and **MRS. KAVITA JITENDRA SAWANE(Wife)** has applied for the **sole membership to the said R.N.A.Liberty Co-Operative Housing Society Ltd. situated at Near Jangid Complex, Mira Road(East), Thane-401107 for transfer of the aforesaid shop in her sole name and the Other Legal Heir including SUHANI JITENDRA SAWANE** have consented for the same.

Any person or persons having any objection for grant of membership or having any claim, right, title or interest or any part thereof either by way of inheritances, heirship or mortgage, lease, leave and license, sale or lien, charge, trust, easement, license, tenancy, injunction, possession, exchange, attachment of the Income Tax Authorities or otherwise howsoever are requested to make the same known in writing within **14 Days** along with the supporting documents to the undersigned at **B-706, Asmita Regency-1, Naya Nagar, Mira Road(East), Thane-401107** within **Fourteen Days (14)** from the date of publication hereof, failing which all such claims and /or objections, if any will be considered as waived and abandoned.

ADV. RAMSHA KHATIB (B.L.S L.L.B)
Date:05-07-2026
Place: Mira Road Mob: 9821715184

'सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड'
(आयबीसी अंतर्गत अवसायनात) यांच्या
मालमत्तेच्या ८ व्या ई-लिलाव विक्रीची सूचना

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, 'सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड' (आयबीसी अंतर्गत अवसायनात असलेली) **(सीआयएन क्र. U45200HR2013PRTC048979;** नोंदणीकृत कार्यालयः ५१०, ५ वा मजला, एबीडब्ल्यू टॉवर, इफको चौक, एम.जी. रोड, गुडगाव, हरियाणा - १२२ ००२) यांचे परिसमापक ज्यांची नियुक्ती माननीय नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (चंदीगड खंडपीठ, न्यायालय क्र. २, चंदीगड) यांनी, आयबीसी २०१६ अंतर्गत निर्णय देणारे प्राधिकरण म्हणून, १७.०७.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे (IA (IBC) (Liq.)/2/Ch/2025 in CP(IB) No.442/CHD/HRY/2019 (दाखल केले)) केली आहे. ते, सदर कॉर्पोरेट कर्जदाराच्या 'कन्सल्टेशन कमिटी'ची (जी 'कमिटी ऑफ क्रेडिटर्स' किंवा पूर्वीची एससीसी म्हणून कार्यरत आहे) १६ व्या बैठकीत (दि. ०४.०७.२०२६ रोजी झालेली) ६६% पेक्षा जास्त मताधिकारासह मिळालेल्या आवश्यक मंजुरीनुसार, खाली नमूद केलेल्या 'सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड' (कॉर्पोरेट कर्जदार) च्या मालमत्तेच्या ई-लिलाव विक्री प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पात्र बोलीदारांकडून निमंत्रण देत आहेत. हा ई-लिलाव, ई-लिलाव वेळापत्रक आणि 'ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजात' नमूद केलेल्या सविस्तर अटी, शर्ती व प्रक्रियेनुसार आयोजित केला जाईल. सदर दस्तऐवज https://ibbi.baanknet.com/ या संकेतस्थळावरून डाउनलोड करता येईल किंवा liquidator.supremevasai@gmail.com या ईमेल पत्त्यावर ईमेल पाठवून मिळवता येईल.

कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तेचे वर्णन	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	राखीव किंमत (भारतीय रुपयांत)	अनामत रक्कम (राखीव किंमतीच्या १०% - भारतीय रुपयांत)	बोलीतील वाढीव रक्कम (भारतीय रुपयांत)
आयबीसीअंतर्गत 'लिक्विडेशन इस्टेट' मध्ये समाविष्ट असलेल्या 'कॉर्पोरेट डेटर'च्या मालमत्तेची स्वतंत्रपणे विक्री; म्हणजेच ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील 'चिंचोटी-कामन-अंजूरफाटा ते मानकोली रस्ता एमएसएच क्र. ४' वरील २६ किमी (०/००० ते २६/४२५ किमी टप्पा) लांबीचा 'फोर-लेनिंग टोल' प्रकल्प आणि तिथे बसवलेली किंवा उपलब्ध असलेली इलेक्ट्रॉनिक फास्टॅग उपकरणांसह इतर यंत्रसामग्री व साधने. ही विक्री "जशी आहे तशी", "ज्या स्थितीत आहे तशी", "जे काही आहे तसे" आणि "कोणत्याही दाव्याशिवाय/परताव्याच्या अधिकाराशिवाय" या तत्त्वांवर केली जाईल. यामध्ये २५.१०.२०१३ रोजीचा 'सबस्टिट्यूशन ॲग्रीमेंट, १६ मे २००९ रोजीचा मूळ सवलत करार आणि 'कॉर्पोरेट डेटर'ने केलेले २३.०७.२००९ रोजीचे 'सबस्टिट्यूशन ॲग्रीमेंट' यांनुसार प्रकल्पातून उद्भवणारे सर्व अधिकार, हितसंबंध, कायदेशीर दावे किंवा लाभ यांचा समावेश असेल. तसेच, कार्य आदेश क्र. टीडी/निविदा/६७८६, दि. २८.०८.२००९ नुसार सवलतीचा कालावधी २४ वर्षे ३ महिने म्हणजेच २७.११.२०३३ पर्यंत आहे आणि महाराष्ट्र शासनाने जीओएम मंजूर केलेला एकूण सवलत कालावधी २४ वर्षे ३ महिने कार्य आदेश जारी झाल्याच्या तारखेपासून ३० कॅलेंडर महिन्यांच्या बांधकाम कालावधीसह आहे, हे लक्षात घेतले जाईल. ही प्रक्रिया आयबीबीआय ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com/ वरील ई-लिलाव वेळापत्रक/कालमर्यादा आणि 'ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजा'तील तपशीलवार अटी, शर्ती व प्रक्रियेनुसार पार पडेल.	**ई-लिलावाची तारीख - २३.०७.२०२६** **ई-लिलावाची वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी ०३.००** **(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद मुदतवाढीसह)**	**रु. ४६,००,००,०००/- (अक्षरी रुपये सेहेचाळीस कोटी मात्र)**	**रु. ४,६०,००,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी साठ लाख मात्र)**	**रु. १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख मात्र)**

अ.क्र.	ई-लिलाव - तपशील आणि वेळापत्रक	ई-लिलावातील संबंधित तारखा
१.	प्रकाशन संस्थेकडे ८ व्या ई-लिलाव विक्रीची सूचना जारी करण्याची तारीख	०४.०७.२०२६ (शनिवार)
२.	संबंधित वर्तमानपत्रात ८ व्या ई-लिलावाची जाहिरात प्रकाशित होण्याची तारीख	०५.०७.२०२६ (रविवार)
३.	आयबीसी च्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेची कागदपत्रे आणि केवायसी/हमीपत्रासह ऑनलाइन बोलीची कागदपत्रे सादर करण्याची अंतिम तारीख	२१.०७.२०२६ (मंगळवार) रोजी किंवा त्यापूर्वी, दुपारी ४.०० वाजेपर्यंत
४.	लिक्विडेटरला पूर्वसूचना देऊन, संभाव्य बोलीदारांद्वारे लिलावातील मालमत्तेची पाहणी / कॉर्पोरेट कर्जदाराच सखोल तपासणी	१३.०७.२०२६ ते १९.०७.२०२६ (सोमवार ते रविवार)
५.	अनामत रक्कम (ईएमडी) जमा करणे	२१.०७.२०२६ (मंगळवार) रोजी किंवा त्यापूर्वी, दुपारी ४.०० वाजेपर्यंत
६.	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	२३.०७.२०२६ (गुरुवार) रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० या वेळेत

टीप: * लिक्विडेटरकडे किंवा त्यांच्या विरोधात हमी आणि नुकसानभरपाईबाबत कोणतेही दावे किंवा विधाने केली जाणार नाहीत.

महत्त्वाच्या सूचना.

१. वर नमूद केलेल्या कॉर्पोरेट डेटरच्या मालमत्तेची ई-लिलावाद्वारे विक्री ही पूर्णपणे"जसे आहे, जिथे आहे", "जसे आहे, जे आहे", "जे काही आहे त्या आधारावर" आणि "कोणत्याही दाव्याच्या अधिकाराशिवाय (विना-प्रतिदावा)" या तत्त्वांवर आधारित तसेच 'इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, २०१६' (आयबीसी) आणि 'आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६' (ज्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केल्या गेल्या आहेत) यांच्या तरतुदींच्या अधीन राहून स्वतंत्रपणे केली जाईल.

२. ई-लिलाव प्रक्रियेचे संपूर्ण दस्तऐवज ज्यामध्ये परिशिष्ट-६ नुसार कॉर्पोरेट डेटरच्या मालमत्तेचे तपशील, इतर संबंधित कागदपत्रे आणि ऑनलाइन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्तींचा समावेश आहे - ते **https://ibbi.baanknet.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत किंवा केले जातील.

३. इच्छुक बोलीदारांनी आवश्यक कागदपत्रे सादर करणे आणि 'ईएमडी ' (बयाणा रक्कम) जमा करणे हे केवळ https://ibbi.baanknet.com या पोर्टलवर 'खरेदीदार' म्हणून लॉग-इन करूनच करणे आवश्यक आहे; तसेच मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून त्याच पोर्टलवर पात्रता दर्शवणारे दस्तऐवज सादर करणेही गरजेचे आहे. मदतीसाठी, बोलीदार 'बँकनेट' हेल्पलाईन क्रमांक +९१ ८२९१२२०२२० वर संपर्क साधू शकतात. कृपया याची नोंद घ्यावी की, यापैकी कोणतीही कागदपत्रे हार्ड कॉपी किंवा सॉफ्ट कॉपी स्वरूपात कोणत्याही प्रकारे लिक्विडेटरसोबत शेअर केली जाऊ नयेत.

४. इच्छुक बोलीदारांनी बयाणा रक्कम https://ibbi.baanknet.com या 'बँकनेट' पोर्टलवरील ई-वॉलेटमध्ये जमा करणे आवश्यक आहे आणि त्याबाबत लिक्विडेटरला कोणत्याही प्रकारे पूर्वसूचना देण्याची आवश्यकता नाही. लिलाव यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर, सर्वाधिक बोली लावणाऱ्याची ईएमडी रक्कम लिक्विडेटरद्वारे व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या कॉर्पोरेट डेटरच्या 'लिक्विडेशन खात्यात' हस्तांतरित केली जाईल.

५. सुधारित लिक्विडेशन नियमावलीच्या तरतुदींनुसार, सर्व इच्छुक बोलीदारांनी एक प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे की, ते लागू असलेल्या मर्यादेपर्यंत आयबीसीच्या (आयबीसी) कलम २९अ अंतर्गत कोणत्याही अपात्रतेस पात्र नाहीत आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, आयबीसी अंतर्गत लिक्विडेटरद्वारे अनामत रक्कम जप्त केली जाईल.

६. यशस्वी बोलीदाराने लिक्विडेटरद्वारे इरादापत्र जारी केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत विक्रीची उर्वरित रक्कम प्रदान करावी. ३० दिवसांनंतर परंतु ९० दिवसांच्या आत केलेल्या पेमेंटवर लिक्विडेशन नियमावलीनुसार किंवा आयबीसी/आयबीबीआयच्या (आयबीसी/आयबीबीआय) सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार (असल्यास) व्याज आकारले जाईल. इरादापत्राच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत पेमेंट प्राप्त न झाल्यास, विक्री रद्द केली जाईल. कॉर्पोरेट कर्जदाराच्या धनको समिती ("पूर्वीची एससीसी") म्हणून काम करणाऱ्या सल्लागार समितीने, लिक्विडेशन नियमावलीच्या नियम ३१ए (१)(एच) अंतर्गत उपरोक्त मुदतवाढ न देण्याचा निर्णय घेतला आहे.

७. लिक्विडेटर, लागू कायद्यानुसार अनुज्ञेय असलेल्या मर्यादेपर्यंत, विक्री प्रक्रियेच्या कोणत्याही प्रमुख अटींमध्ये, कालमर्यादेसह, सुधारणा करण्याचा आणि त्याची सूचना लवकरात लवकर आयबीबीआय वेबसाइटवर किंवा ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर सूचना जारी करून बोली लावणाऱ्यांना देण्याचा अधिकार राखून ठेवतो, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
आयपी संजयकुमार अग्रवाल, लिक्विडेटर
लिक्विडेटर- सुप्रीम वसई भिवंडी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड-आयबीसी अंतर्गत